**प्रेसनोट** **दिनांक १८/०७/२०१९**

# लष्कर पोलीस स्टेशन पुणे शहर

## ०१ तासात मोबाईल शोधून दिल्याबाबत

आज रोजी इसम नामे डॉ मोहमद खाझीनुरी रा. ९२८, सिनेगॉंग स्ट्रिट, सिरीन अपार्टमेंट, प्लॅट नं २, कॅम्प, पुणे हे आज रोजी १२.३० वा च्या सुमारास कोहीनूर हॉटेल येथे नाष्टा करण्यास गेले असता ते त्यांचे ७० हजार रुपयाचे सॅमसंग गॅलेक्सी नोट ८ मोबाईल हॉटेलमध्ये विसरुन गेले होते. तेव्हा सदरचा हॉटेलमधील मोबाईल कोणीतरी अज्ञात इसमाने घेवून गेल्याचे कोहीनूर हॉटेलमधील सी सी टी व्ही मध्ये दिसत असल्याने ते तक्रार देण्यासाठी १७/०० वा. पोलीस ठाणेस आले असता ठाणे अंमलदार पोउनि कुलाळ यांनी पोशि ४३०८/ पुजारी यांना पोलीस ठाणेमधील शासकिय सी सी टी व्ही पाहण्यास सांगितले. सी सी टी व्ही पाहिले असता सदर अज्ञात इसम हा कोहीनूर हॉटेलमधुन बाहेर आल्यानंतर त्याचे ॲक्टीव्हा क्र एम एच १२ ई झेड ३६४२ ने भोपळे चौकाकडे जात असल्याचे दिसले. त्याचे गाडी नंबरवरुन त्यांचा नाव व पत्ता काढला असता त्याचे नाव शीतल जेठानंद शर्मा रा. २/२, अमरज्योत बिल्डींग. पदमजी कंपाउड, भवानी पेठ, पुणे असल्याचे समजले. सदर ठिकाणी लागलीच पोशि ७३४२/ काळे व पो शि ४३०८/ पुजारी व तक्रारदार डॉ मोहमद खाझीनुरी यांच्यासह जावून चौकशी केली व सी सी टी व्ही मधील फोटो दाखविले असता त्यांचे आई हिने सदरचा इसम त्यांचे मुलगा असल्याचे सांगितले व त्याचे नाव नारायण शर्मा असल्याचे सांगून त्यास बोलविले व त्याच्याकडे चौकशी केले असता त्यांने सांगितले कि, मी कोहीनूर हॉटेल येथे चहा पिण्यासाठी गेलो होतो. तेव्हा टेबलावर कोणीतरी मोबाईल विसरुन गेल्याचे दिसले व मी सदर मोबाईल कोणाचा आहे का याबाबत आजूबाजूस चौकशी केली असता कोणाचे नसल्याचे सांगितल्याने मी सदर मोबाईल घेवून पोलीस ठाणेस जात असताना मला घरुन फोन आला म्हणून मी घरी निघून गेलो. मी पुन्हा पोलीस ठाणेस जाणार होतो तेव्हढयात तुम्ही आले असे सांगून त्याचे ताब्यातील वर नमुद मोबाईल काढून दिला सदरचा मोबाईल तक्रारदार डॉ मोहमद खाझीनुरी यांचा असल्याचे त्यांनी ओळखून सांगितले.

सदरची कामगिरी पोशि ७३४२/ काळे व पो शि ४३०८/ पुजारी, पोशि ८६१५/ गुंडगे व पोलीस उपनिरीक्षक कुलाळ यांनी मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रकांत द. भोसले व श्रीमती माया देवरे, पोलीस निरीक्षक गुन्हे लष्कर पोलीस स्टेशन पुणे यांचे मार्गदर्शना खाली करण्यात आलेली आहे.

